26 JUL 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेतील सूर : तज्ज्ञांचे मार्गदर्शन

# युवा पिढीसाठी नवे शैक्षणिक धोरण राबवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देशाची युवा पिढी ज्ञानसंपन्न, विचारी होऊन तिने देशाच्या सामाजिक-आर्थिक, बौद्धिक, सांस्कृतिक विकासामध्ये योगदान द्यावे. त्यादृष्टीने सक्षम बनविण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण राबविले जाणे आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत सोमवारी उमटला.

विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे शिक्षण संस्थाचालक, प्रतिनिधींसाठी 'नवे शैक्षणिक धोरण (उच्च शिक्षण) : उद्दिष्ट्ये व अंमलबजावणी' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. त्यात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी.एन. जगताप, डॉ. आर.एस. माळी, आनंद मापुस्कर यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

## तज्ज्ञ काय म्हणाले?

नव्या शैक्षणिक धोरणाचा सध्या अस्तित्वात असलेल्या शिक्षण संस्थांच्या सद्य:स्थितीमध्ये कोणताही परिणाम होणार नाही. त्यांनी स्वायत्त व्हावे.

\- आर. एस. माळी



विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख बनविण्यासाठी छोटे-छोटे आधुनिक व गरजेचे अभ्यासक्रम राबविण्याची आवश्यकता आहे.

\- आनंद मापुस्कर

लोकांकडे पैसा आहे, मात्र गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव आहे. अर्थकारण व शिक्षण यांच्यातील संबंध हे वर्तुळाकार असतात. त्यामुळे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना या क्षेत्रातील शिक्षकांसह धुरिणांनी आपल्या विद्यार्थ्यांचे हित सर्वोच्च मानून अंमलबजावणी केल्यास ते निश्चितपणे हितावह ठरेल, असे डॉ. जगताप यांनी सांगितले. नव्या शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये संस्थाचालकांची भूमिका ही फार महत्त्वाची ठरणार आहे. येत्या दहा ते पंधरा वर्षांत शिक्षण क्षेत्रात आपल्या केवळ संख्यात्मकच नव्हे, तर गुणात्मक बदलही घडवायचे असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, एस. एस. महाजन उपस्थित होते. डॉ. एम.एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले.

26 JUL 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पेपर फुटीत महाविद्यालयातील २ कर्मचारी

## विद्यापीठाच्या चौकशीचा निष्कर्ष : संशयितांचे तात्पुरते निलंबन

### सीसीटीव्ही फुटेज तपासणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बी.एस्सी. भाग तीनच्या सहाव्या सत्रातील फिजिकल केमिस्ट्री विषयाच्या प्रश्नपत्रिकेची (पेपर) वेळेपूर्वी प्रिंट काढण्याचा (पेपर फुटी) प्रकार शनिवारी सांगली जिल्ह्यातील एका महाविद्यालयात घडला. त्यामध्ये या महाविद्यालयातील लॅब असिस्टंट, शिपाई या कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये समोर आली आहे.

महाविद्यालय प्रशासनाने त्यांचे तात्पुरते निलंबन केले आहे. त्यादिवशीचे या महाविद्यालयात परीक्षाविषयक एसआरपीडी कक्षातील कामकाजाचे सीसीटीव्ही फुटेज परीक्षा मंडळ तपासणार आहे.

सीसीटीव्ही फुटेज आणि चौकशी अहवाल दोन दिवसांमध्ये सादर करण्याची सूचना या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना परीक्षा मंडळाचे संचालक डॉ अजितसिंह जाधव यांनी केली आहे. वेळेपूर्वी काढलेली पेपरची प्रिंट सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हायरल झाल्याची शक्यता असल्याने त्या दिवशीची परीक्षा विद्यापीठ प्रशासनाने रद्द केली. त्यासह या प्रकरणाची चौकशी करण्याचे प्रशासनाने स्पष्ट केले होते. त्यानुसार कार्यवाही सुरू केली. त्यात या महाविद्यालयातील प्राचार्यांना पेपरदिवशीचे सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांबाबतचा अहवाल सादर करण्याची सूचना केल्याचे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. जाधव यांनी सांगितले. संबंधित अहवाल परीक्षा प्रमाद समितीसमोर ठेवला जाणार आहे. पुढील कारवाई समितीकडून होईल. प्राथमिक चौकशीत दोषी आढळलेल्या दोन कर्मचाऱ्यांचे तात्पुरते निलंबन केले असल्याची माहिती डॉ. जाधव यांनी दिली.

लोकमत

# ‘बी. एस्सी’चे पेपर आज होणार

कोल्हापूर : तांत्रिक कारणामुळे शिवाजी विद्यापीठाने रद्द केलेले बी. एस्सी. संख्याशास्त्र आणि फिजिकल केमिस्ट्री या दोन्ही विषयांचे पेपर आज, मंगळवारी होणार आहेत. बी. व्होक टुरिझम, डिफेन्स स्टडी अशा विविध १४ अभ्यासक्रमांचे निकाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सोमवारी ऑनलाईन जाहीर केले. दिवसभरात बी. एस्सी. फूडसायन्स, शुगर टेक अशा एकूण ८६ विषयांच्या ५२ हजार ९३१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. बी. एस्सी भाग तीन सत्र सहा संख्याशास्त्र विषयाचा २० जुलै रोजी तांत्रिक कारणामुळे, तर शनिवारी फिजिकल केमिस्ट्री विषयाचा पेपर अपरिहार्य कारणामुळे रद्द केला होता.

लोकमत



# 'नॅनो सायन्स'बाबत व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातर्फे २७ ते ३० जुलै दरम्यान दुपारी १२ ते १ यावेळेत 'नॅनो सायन्स आणि नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर मोफत ऑनलाइन व्याख्यानमाला होणार आहे. बारावी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी तसेच पालकांसाठी व्याख्यानमाला आयोजित केली आहे. यामध्ये तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

26 JUL 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानसंपन्न पिढीच्या निर्मितीसाठी नवे शैक्षणिक धोरण राबविणे आवश्यक

## शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेमधील सूर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारताची युवा पिढी ज्ञानसंपन्न आणि विचारी होऊन देशाच्या सामाजिक, आर्थिक, बौद्धिक व सांस्कृतिक विकासामध्ये योगदान देण्यास सक्षम बनविण्याच्या दृष्टीने नवे शैक्षणिक धोरण राबविले जाणे आवश्यक आहे, असा सूर सोमवारी शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष कार्यशाळेत उमटला.

विद्यापीठाअंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे शिक्षण संस्थाचालक, प्रतिनिधी यांच्यासाठी 'नवे शैक्षणिक धोरण (उच्च शिक्षण): उद्दिष्टे व अंमलबजावणी' या विषयावर विशेष एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एन. जगताप म्हणाले, देशात शैक्षणिक सुधारणेच्या अनुषंगाने साधारण २० महत्त्वाची धोरणे आली. तथापि, त्यातील कित्येक चांगल्या गोष्टी अमलात आणल्या नाहीत.



**शिवाजी विद्यापीठातून...**

परिणामी, शैक्षणिक प्रगतीत अनेक अडचणी निर्माण झाल्या. शंभर वर्षांत शिक्षण म्हणजे केवळ विद्यार्थ्याला सुसंस्कृत बनविणे, एवढाच मर्यादित हेतू बाळगून काम सुरू राहिले. मात्र, या शिक्षणाने विद्यार्थी रोजगाराभिमुख झाला का, त्याला रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये प्राप्त झाली का, २१ व्या शतकात जगण्यासाठीची कौशल्ये त्याला मिळाली का? असे प्रश्न अनुत्तरित आहेत.

डॉ. आर. एस. माळी म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाचा सध्या अस्तित्वात असलेल्या शिक्षण संस्थांवर कोणताही परिणाम होणार नाही. त्यांना मंजूर असलेल्या जागा, अनुदान, विनाअनुदान यांची संरचना जशीच्या तशी राहणार आहे. तथापि, त्यांनी स्वायत्त होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी 'नॅक'चे मूल्यांकन करून घेणे आवश्यक ठरणार आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, आनंद मापुस्कर यांनी मार्गदर्शन केले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन उपस्थित होते.

### गुणात्मक बदलही घडवायचे आहेत : डॉ. शिर्के

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची आहे. १५ वर्षांत शिक्षण क्षेत्रात केवळ संख्यात्मकच नव्हे, तर गुणात्मक बदलही घडवायचे आहेत.

जनसंपर्क कक्ष
26 JUL 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ ऑफलाईन एमसीक्यू परीक्षेला ५२ हजार विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राच्या विद्यापीठस्तरावरील परीक्षेंतर्गत सोमवारी ६८ विषयांच्या परीक्षा झाल्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सुमारे ५२ हजार ९३१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने १९ जुलैपासून २७६ महाविद्यालय, विद्यापीठस्तरावरील परीक्षांना प्रारंभ झाला आहे. बी.एस्सी., बी.कॉम., बी.ए. बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स, शुगर टेक), एमबीए, एमए., बी.ई.बीएड., एम.एस्सी.,एलएलबी, एलएलएम, बी.व्होक., एमए. (मास कम्युनिकेशन) आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. महाविद्यालयस्तरावरील १८६ परीक्षांपैकी आजअखेर ५६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी दिली.

26 JUL 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या पिढीसाठी नवे शैक्षणिक धोरण हवे

## शिवाजी विद्यापीठाच्या कार्यशाळेत मान्यवरांचा सूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारताची युवा पिढी ज्ञानसंपन्न आणि विचारी होऊन तिला देशाच्या सामाजिक, आर्थिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक विकासामध्ये योगदान देण्यास सक्षम बनवण्याच्या दृष्टीने नवे शैक्षणिक धोरण राबवले जाणे आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष कार्यशाळेत उमटला.

विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने सोमवारी शिक्षण संस्थाचालक, त्यांचे प्रतिनिधी यांच्यासाठी 'नवे शैक्षणिक धोरण (उच्च शिक्षण) : उद्दिष्ट्ये व अंमलबजावणी' या विषयावर विशेष एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एन. जगताप, डॉ. आर. एस. माळी आणि




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत इतर मान्यवर.

आनंद मापुस्कर उपस्थित होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. जगताप यांनी नव्या शैक्षणिक धोरणाचा सर्वंकष आढावा घेतला. ते म्हणाले, १८३५ पासून देशात शैक्षणिक सुधारणेच्या अनुषंगाने साधारण वीस महत्त्वाची धोरणे आली. तथापि, त्यातल्या कित्येक चांगल्या गोष्टी आपण अंमलात आणल्या नाहीत. परिणामी, शैक्षणिक प्रगतीमध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या. १८८२ मध्ये महात्मा फुले यांनी हंटर कमिशनसमोर ऐतद्देशीय विद्यार्थ्यांना गणित, इतिहास, व्याकरण, भूगोल इत्यादी विषयांच्या पलीकडे जाऊन शेतीचे मूलभूत शिक्षण देण्याची सूचना केली होती. तांत्रिक कलाकौशल्यांचे प्रदान शालेय जीवनापासून करण्याचा आग्रह त्यांनी धरला होता. त्यानंतरच्या शंभर वर्षांतही शिक्षण म्हणजे केवळ विद्यार्थ्याला सुसंस्कृत बनविणे, एवढाच मर्यादित हेतू बाळगून काम सुरू राहिले.

प्रा. आर. एस. माळी म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाचा सध्या अस्तित्वात असलेल्या शिक्षण संस्थांच्या सद्यःस्थितीमध्ये कोणताही परिणाम होणार नाही. त्यांना मंजूर असलेल्या जागा, अनुदान, विनाअनुदान यांची संरचना जशीच्या तशी राहणार आहे. तथापि, त्यांनी स्वायत्त होणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये संस्थाचालकांची भूमिका ही फार महत्त्वाची ठरणार आहे. येत्या दहा ते पंधरा वर्षांत शिक्षण क्षेत्रात आपल्याला केवळ संख्यात्मकच नव्हे, तर गुणात्मक बदलही घडवायचे आहेत.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनीही मार्गदर्शन केले. डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक, सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन उपस्थित होते.

सकाळ

# महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी फोडला पेपर

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : विज्ञान शाखेच्या तृतीय वर्षाचा फिजिकल केमेस्ट्रीचा पेपर फोडण्यात महाविद्यालयातील शिपाई आणि लॅब असिस्टंट यांचा सहभाग असल्याचे प्राथमिक चौकशीतून पुढे आले. त्यांच्यावर तातुरत्या निलंबनाची कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणाचा अहवाल प्रमाद समितीसमोर ठेवण्यात येईल. त्यानंतर संबंधित महाविद्यालय आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई केली जाईल. शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राची परीक्षा सध्या सुरू आहे. यात सांगलीतील एका केंद्रावर बी.एस्सी.च्या तृतीय वर्षाच्या फिजिकल केमेस्ट्री या विषयाचा पेपर फुटला. त्यामुळे हा पेपर रद्द करून मंगळवारी (ता. २६) घेण्यात येणार आहे.

दरम्यान, प्राथमिक चौकशीत संबंधित महाविद्यालयाचा शिपाई आणि लॅब असिस्टंट यांनी पेपर फोडल्याचे दिसून येते. आज संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना बोलावून या घटनेचे सीसीटी फुटेज व अन्य पुराव्यांचा विस्तृत अहवाल सादर करण्यास परीक्षा विभागाने सांगितले आहे. त्यानंतर दोषींवर कारवाई केली जाईल. तोपर्यंत संशयीत कर्मचाऱ्यांना निलंबीत केले गेले आहे.

तरुण भारत

# शैक्षणिक धोरण अंमलबजावणीस 'मनुष्यबळ'चे योगदान आवश्यक

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिक्षण व्यवस्थेत नवीन धोरणे येत आहेत. त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी शिक्षण संस्थाची प्रमुख जबाबदारी ही आहे. शिवाय ही धोरणे जाणून घेऊन ती समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी उद्योग क्षेत्रातील मनुष्यबळ व्यवस्थापकांनीही योगदान देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी येथे केले.

विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने 'नवीन शैक्षणिक धोरण २०२० : उद्योजक व मानव संसाधन व्यवस्थापक यांची भूमिका" या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राच्या उदघाटनप्रसंगी डॉ. गुरव बोलत होते. चर्चासत्रात कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यातील अनेक उद्योजक व मानव संसाधन व्यवस्थापक सहभागी झाले होते. डॉ. गुरव म्हणाले, येत्या शैक्षणिक वर्षापासून नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सर्व बाजूंनी तयार आहे.

यावेळी संघसेन जगतकर यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी संजय बेनके, व अनंत पाटील उपस्थित होते. महेश चव्हाण यांनी आभार मानले.

तरुण भारत

# बी. एसस्सीचे रद्द केलेले दोन पेपर आज

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल या उन्हाळी सत्राअंतर्गत सुरु असलेल्या परिक्षेतील बी. एसस्सी भाग-३, सेमिस्टर-६ (स्टॅटेस्टीक) पेपर-८ हा पेपर काही कारणास्तव रद्द केला होता. तसेच काही अपरिहार्य कारणास्तव २३ जुलै रोजीचा बी. एसस्सी भाग-३, सेमिस्टर-६, पेपर-१६ हा पेपरही रद्द केला होता. हे दोन्ही पेपर मंगळवार २६ रोजी पुन्हा घेतले जाणार आहे. दुपारी ४ ते सायंकाळी ५ अशी पेपरची वेळ असेल. या दोन्ही पेपर्संना जे विद्यार्थी गैरहजर राहतील त्यांच्यासाठी पुनर्परिक्षा घेतली जाणार नाही. पेपरदरम्यान होणाऱ्या गैरप्रकार आळा घालण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने भरारी पथके नेमली आहेत. ही पथके गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाच्या परिक्षा प्रमाद समितीसमोर ठेवतील. या समितीकडून जसे संकेत मिळतील, तशी कारवाई केली जाईल, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे कळवले आहे.